CMYK

दैनिक

# मराठवाडा पत्र

छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर

गुरुवार
३०.१.२०२५
वर्षे : ४ अंक : २९३
किंमत : ३ रू. पाने : ४

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 पान -१




# मनोज जरांगे यांची प्रकृती खालावली

जालना, (वृत्तसेवा):-मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा उपोषण सुरु केले आहे. २५ जानेवारीपासून त्यांनी अंतरवाली सराटीत उपोषण सुरु केले आहे. उपोषणाच्या पाचव्या दिवशी त्यांची प्रकृती खालवली आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांनी मंगळवारी रात्री सलाईनद्वारे उपचार घेतले. अंतरवाली सराटीत उपोषण स्थळीच मनोज जरांगे यांना सलाईन लावण्यात आले आहे. मनोज जरांगे यांनी सलाईन घ्यावी, अशी विनंती भाजप आमदार सुरेश धस यांनी देखील केली होती. मनोज जरांगे यांची आमरण उपोषणाच्या चौथ्या दिवशी प्रकृती खालवली होती. त्यामुळे डॉक्टरांकडून मध्यरात्री त्यांना सलाईन लावण्यात आली. त्यानंतर डॉक्टर आणि मराठा आंदोलकांच्या आग्रहानंतर मनोज जरांगे

## आ.धस यांची ही विनंती केली मान्य

यांनी उपचारास होकार दिला. भाजपा आमदार सुरेश धस मंगळवारी अंतरवाली सराटीमध्ये आले होते. त्यांनी मनोज जरांगे यांच्या तब्येतीची विचारपूस केली होती. त्यांनी मनोज जरांगे यांनी सलाईनद्वारे उपचार घ्यावे, अशी विनंती केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनोज जरांगे यांनी उपचार घ्याव, असा आग्रह केल्याचे आमदार धस यांनी सांगितले होते. मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीकडे आरोग्य पथक लक्ष ठेवून आहे. नियमित त्यांच्या प्रकृतीची तपासणी वैद्यकीय पथकाकडून केली जात आहे. या वैद्यकीय पथकात जिल्हा शल्य चिकित्सक प्रदीप पाटील आहेत. मनोज जरांगे पाटील यांचा आमरण उपोषणाचा पाचवा दिवस आहे. ते दुपारी एक वाजता महत्वाची पत्रकार परिषद घेणार आहेत. विशेष म्हणजे कालच भाजपा आमदार सुरेश धस यांनी मनोज जरांगे यांची भेट घेतली होती. त्यानंतर आजही आमदार सुरेश धस हे मनोज जरांगे यांची भेट घेण्याची शक्यता आहे. मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवालीत उपोषण सुरु आहे. त्या उपोषणास पाठिंबा देण्यासाठी मराठा समाज पुणे जिल्ह्याच्या वतीने बेमुदत आमरण आणि साखळी उपोषण २९ जानेवारीपासून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर करण्यात येत आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषण स्थळी शासनाचा एकही प्रतिनिधी किंवा मंत्री भेट द्यायला आलेला नाही. त्यामुळे आता मराठा समाजाकडून पुणे शहरातील विविध ठिकाणी चक्का जाम आंदोलन करण्यात येईल, अशा इशारा अखंड मराठा समाजाच्या वतीने देण्यात आला आहे. दरम्यान, धनंजय देशमुख यांनीही मनोज जरांगे पाटील यांना उपचार घेण्याची विनंती केली आहे. दादांना एकच विनंती आहे त्यांनी त्यावेळेस सलाईन घ्यावी, असे धनंजय देशमुख यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीआम्हाला शब्द दिला आहे, त्यांना उचित वाटते ते करावे, असे त्यांनी म्हटले आहे.



# बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेला ३०० कोटींचे सॉफ्ट लोण सवलतीच्या व्याजदराने द्या

## मंत्री धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे यांची अजितदादांना संयुक्त मागणी

मुंबई (वृत्तसेवा):-बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेला कृषी व अकृषी असा दोन्ही प्रकारचा पत पुरवठा करून शेतकरी वर्गाला दिलासा देता यावा, यासाठी बीड जिल्हा बँकेस बुलढाणा जिल्ह्याच्या धर्तीवर राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून ३०० कोटींचे सॉफ्ट लोण सवलतीच्या व्याज दराने उपलब्ध करून देण्यात यावे. व्याजात सवलत देता येत नसल्यास विशेष बाब म्हणून अर्थ खात्याने अर्धे व्याज भरून बँकेला सहकार्य करावे, अशी मागणी राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी आज बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संदर्भात आयोजित बैठकीतून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या कडे केली आहे. तर या मागणीस पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी देखील समर्थन दिले



आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री, अर्थ व नियोजन मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज नाशिक व बीड जिल्हा मध्यवर्ती बँकांना मदत करण्याच्या अनुषंगाने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे, पर्यावरण व पशू संवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, मंत्री नरहरी झिरवळ यांसह संबंधित विभगांचे अधिकारी उपस्थित होते. बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेने प्रशासकीय मंडळाच्या माध्यमातून २०१९ पासून चांगले काम करून दाखवले. बँकेचा घासरलेला दर्जा व वसुलीमध्ये सुधारणा करून ब दर्जा मिळवला. आता बँकेच्या कृषी व अकृषी कर्जांच्या पुरवठ्यासाठी बाधा येऊ नये, यासाठी ३०० कोटी रुपयांचे सॉफ्ट लोण देण्यात यावे, अशी मागणी एकमुखाने करण्यात आली. राज्य सहकारी बँकेने बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती बँकेला याच प्रकारे मदत केली होती, मात्र तिथे देण्यात आलेला व्याजदर हा बीड जिल्हा बँकेला परवडणारा नसून, त्यात सवलत द्यावी, किंवा अर्धा व्याजाचा भार अर्थ व नियोजन खात्याने उचलावा, अशी विनंती धनंजय मुंडे यांनी प्रशासक मंडळाच्या वतीने केली. यावेळी उपुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी याबाबतचा प्रस्ताव तातडीने मागवून घेत अर्थ खाते, राज्य सहकारी बँक व नाबार्ड शी चर्चा करून लवकरच सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले आहे. दरम्यान बँकेच्या ५० शाखा असून, तिथले फर्निचर, संगणक आदी जुनाट ▶▶पान २ वर

# सुरेश धस यांनी टाकला आणखी एक लेटर बॉम्ब



बीड, (प्रतिनिधी) :- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून भाजपचे आमदार सुरेश धस यांनी आजपर्यंत अनेक धक्कादायक आरोप केले आहे. पोलिसांचा तपास असेल किंवा या प्रकरणात नेमकं काय काय घडलं याची माहिती धस यांनी उघड केली. पण आता सुरेश धस यांनी थेट राष्ट्रवादीचे मंत्री धनंजय मुंडे यांच्यावरच आता आरोप केला आहे. 'परळीमध्ये धनंजय मुंडे पालकमंत्री असताना ३७ कोटीची ७० लाख रुपये काम न करता बोगस बिलं उचलली' असा थेट आरोपच सुरेश धस यांनी केला. भाजपचे आमदार सुरेश धस यांनी पत्रकार परिषद घेऊन पुन्हा एकदा धक्कादायक आरोपाची माळ फोडली आहे. यावेळी सुरेश

### थेट धनंजय मुंडे निशाण्यावर, पुरावेच दाखवले!

धस यांनी थेट धनंजय मुंडे यांच्यावरच निशाणा साधला आहे. पालकमंत्री यांनी पद भाड्यानं दिलं होतं. त्यावेळी मोठ्या प्रमाणात बोगस बिले उचलली. संजय मुंडे असं या अधिकाऱ्याचं नाव होतं. संजय मुंडे यांच्याकडे कार्यकारी अभियंत्याचां प्रभारी चार्ज देऊन बिलं उचलली. जिल्हा वार्षिक योजना २०२१-२२अंतर्गत परळी आणि आंबेजोगाई कामे न करता कोट्यवधी बिले उचलली. तब्बल ३७ कोटीची ७० लाख रुपये काम न करता बोगस बिलं उचलली. एवढंच नाहीतर सार्वजनिक बांधकाम विभागात नऊ कामाचे १३ कोटी बोगास बिले दिली. काम मात्र काम केलीच नाही, असा आरोप सुरेश धस यांनी केला. तसंच, अर्थ संकल्पामध्ये परळी पुस बर्दापुर काम दिलं होतं. पण ते काम न करता बिलं उचलली. क्षेत्रीय अधिकारी यांनी पाहणी केली असता एकाच कामाचे दोन वेळा बिल उचली असल्याचं समोर आलं होतं. २५/३/२०२० मध्ये ५७ कामाच्या प्रशासकीय मान्यता रद्द केली. मात्र १४ कोटीचे बिले ▶▶पान २ वर

# दगाफटका कराल तर सत्तेत सुखाने राहू देणार नाही

## जरांगेंचा सरकारला इशारा

मुंबई, (वृत्तसेवा) :- मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे गेल्या ५ दिवसांपासून उपोषण आंदोलन करत आहेत. दरम्यान जरांगे पाटलांनी उपचार घेण्यास नकार दिला आहे. आमच्या मागण्या पूर्ण करणार आहात की नाही या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी सांगावं, असं आवाहन जरांगेंनी केलं आहे. तर दगा फटका कराल तर ५ वर्ष तुम्हाला सत्तेत सुखानं राहू देणार नाही असा इशारा देखील मनोज जरांगे यांनी दिला आहे. तसेच जरांगेंनी डॉक्टरांच्या तपासणीसाठी नकार दिला आहे. मनोज जरांगे म्हणाले, आमच्या मागण्या पूर्ण करणार की नाही आम्ही अजून किती वाट बघायचीआमचा अंत बघणार आहात का? उपोषणावर मी ठाम आहे - आरक्षण देणार की नाही हे मुख्यमंत्र्यांनी सांगावं. दगाफटका कराल तर खबरदार. पाच वर्ष तुम्हाला सत्तेत सुखानं राहू देणार नाही. मनोज जरांगे म्हणाले, मी माझ्या जातीच्या कल्याणासाठी मागे पुढे सरकू शकतो पण स्वार्थासाठी नाही. यातच जातीच कल्याण आहे. आमच्या एकाही बांधवांचा जीव जायला नको. मला सरकारला विचारायचं आहे तुम्ही आमच्या मागण्या पूर्ण करणार आहे की नाही. ▶▶पान २ वर



### राज्यभर मराठा समाजाचे आक्रमक आंदोलन

सरकार जाणून-बुजून दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत पुण्यात देखील मराठा आंदोलकांकडून आमरण उपोषण सुरू करण्यात आला आहे. या आंदोलनात १० दिवस माराठा आंदोलनकर्ते आंदोलन उपोषण करणार असून त्याचबरोबर येत्या दोन दिवसात जर सरकारने या आंदोलनाकडे गांभीर्याने पाहिलं नाही. तर राज्यभर मराठा समाजाचा आक्रमक आंदोलन पाहायला मिळेल असा इशारा देखील यावेळी आंदोलकांनी दिला आहे.

# पदोन्नती करूनच अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करावे

## आ.संदीप क्षीरसागरांची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे मागणी

बीड, (प्रतिनिधी):- बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडून सन २०२३-२४ च्या संच मान्यतेच्या आधारे अतिरिक्त शिक्षक समायोजन करण्याचे आदेश काढण्यात आले आहेत. परंतु पदोन्नती न करताच शिक्षकांचे समायोजन करणे हे शिक्षक बंधू-भगिनींवर अन्यायकारक ठरणार आहे त्यामुळे अगोदर पदोन्नतीची प्रक्रिया राबवून नंतरच समायोजन करावे अशी विनंती आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकार्यांकडे केली आहे. दरम्यान पदोन्नती न करताच समायोजन केल्यास गुरूवार (दि.३०) रोजी पासून आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा शिक्षक संघटनांकडून देण्यात आला आहे. दि.२८ जानेवारी २०२५ रोजी बीड जिल्हा परिषदेकडून शिक्षकांच्या समायोजनाबाबत आदेश काढण्यात आला असून दि.३१ जानेवारी २०२५ रोजी शिक्षक समायोजन प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. परंतु सदरील समायोजन प्रक्रिया ही पदोन्नती प्रक्रिया न करताच करण्यात येणार असल्याने जिल्ह्यातील शिक्षक-शिक्षिका बांधवांवर अन्यायकारक ठरणार आहे. सन २०२३-२४ च्या संचमान्यतेच्या आधारे बीड जिल्हा परिषद शिक्षण विभाग यावेळी अतिरिक्त शिक्षकांचे ▶▶पान २ वर



# कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणातील सहा आरोपींना जामीन



मुंबई, (वृत्तसेवा):- कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्या प्रकरणात गेल्या सहा वर्षापासून अटकेत असलेल्या सहाही आरोपींना मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. अटक झाल्यापासून आरोपी तुरुंगातच आहेत आणि खटला लवकर निकाली लागण्याची शक्यता नाही, त्यामुळे जामीन मंजूर करत असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे सचिन अंदुरे, गणेश मिस्कीन, अमित देगवेकर, भरत कुरणे आणि वासुदेव सूर्यवंशी या पाच आरोपींना जामीन मंजूर झाला आहे. तर आरोपी वीरेंद्रसिंह तावडे याच्या जामीन अर्जाचा स्वतंत्रपणे आढावा घेण्याचे हाय कोर्टाकडून ▶▶पान २ वर

# माझ्या नैतिकेनुसार मी दोषी नाही-धनंजय मुंडे

मुंबई, (वृत्तसेवा):- माझी नैतिकता ही माझ्या जनतेसोबत आहे. मात्र, माझ्या नैतिकतेनुसार मी दोषी. मी जर दोषी असेल तर दाखवून द्या, मी राजीनामा देण्यास तयार असल्याचे मंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात प्रमुख आरोपी असलेल्या वाल्मिक कराड सोबत धनंजय मुंडे याचे संबंध आहेत. त्यामुळे धनंजय मुंडे यांनी देखील राजीनामा द्यावा, ▶▶पान २ वर



# महाकुंभमेळ्यात चेंगराचेंगरी, ३० भाविकांचा मृत्यू तर ९० जण जखमी

मुंबई, (वृत्तसेवा):-महाकुंभात झालेल्या चेंगराचेंगरी दुर्घटनेत ३० भाविकांचा मृत्यू झाला आहे. तर या घटनेत एकूण ९० भाविक जखमी झाले आहेत. योगी सरकारने ही आकडेवारी जाहीर केली आहे. उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे महाकुंभ मेळ्यादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ३० जणांचा मृत्यू झाला . तर ९० जण जखमी झाले. त्यांना रुग्णालयात नेण्यात आले. डीआयजी प्रयागराज मेला यांनी सांगितले की, मृतांपैकी २५ जणांची ओळख पटली आहे.



मौनी अमावस्येनिमित्त संगम शहरात मंगळवारी सकाळपासूनच गर्दी झाली होती. मंगळवार-बुधवारी मध्यरात्रीनंतर अचानक रात्री एक ते दोन वाजण्याच्या दरम्यान संगम नाक्यावर चेंगराचेंगरी झाली. यामध्ये अनेकांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. त्याचवेळी मोठ्या प्रमाणात भाविक जखमी झाल्याची प्रकरणे समोर आली. मृतांच्या संख्येबाबत सकाळपासूनच अनेक कयास लावले जात होते. वेगवेगळ्या स्त्रोतांकडून मृत्यूचे आकडे नोंदवले जात राहिले. मात्र, प्रशासनाने याबाबत मौन बाळगले आहे. प्रयागराज मेळा प्रशासनाने मौनी अमावस्येला गर्दी नियंत्रित करून आखाड्यांची आंघोळीची प्रक्रिया संपवून अपघाताची अधिकृत माहिती दिली. सायंकाळी उशिरा पत्रकार परिषदेत डीएमने मृतांची संख्या जाहीर केली. अपघातातील मृत आणि जखमींची माहिती प्रयागराज फेअरच्या व्यवस्थापनाने दिली आहे. पीएम मोदींनी यापूर्वीच या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या ▶▶पान २ वर



# सीतारामन 'सिंग' होतील?



अर्थसंकल्पपूर्व आठवड्यात भांडवली बाजाराचे सातत्याने कोसळणे हे कोणत्याही दृष्टिकोनातून पाहिले तरी नकारात्मकच ठरते. भांडवली बाजार आणि देशाची अर्थव्यवस्था यांच्यात काहीही सांगड नसते हे खरे. पण भावनिक भांडवली बाजारास येणाऱ्या काळाची चाहूल लागत असते हेही खरे. त्यामुळेच ही बाजाराची घसरण एकंदर अर्थव्यवस्थेची अपेक्षाशून्यता दर्शवते. गेली काही वर्षे भारताने जगातील सर्वात वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था असल्याची शेखी मिरवली. ती योग्यच होती. कारण युरोपने मान टाकलेली आणि चीन मंदावलेला. अशा अवस्थेत वासरात लंगडी गाय शहाणी ठरावी तसे आपण प्रगतीचा मानदंड ठरत गेलो. त्यात जगातील पहिल्या पाचांत असण्याचे इरादे, दुसरा क्रमांक लवकरच गाठण्याच्या आणाभाका आणि २०४७ सालापर्यंत भारत विकसित होणार असल्याची द्वाही यामुळे सगळ्या वातावरणात आशावाद ठासून भरलेला होता. किंबहुना तसा तो भरलेला राहील, असेच समस्त व्यवस्थेचे प्रयत्न होते. ते काही काळ यशस्वी ठरलेदेखील. पण स्वत:चा विकासाचा वेग सातत्याने राखण्यासाठी इतरांनी मंदावणे इतकेच पुरेसे नसते. त्यामुळे झाले असे की विविध जागतिक वित्तीय संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीपासून ते आपल्या रिझर्व्ह बँकेपर्यंत सगळ्यांनीच भारताच्या विकासदराचा अंदाज कमी कमी करायला सुरुवात केली. हे कमी म्हणून की काय अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांचे सत्तारूढ होणे आणि त्यांनी त्यांच्या पद्धतीने वॉशिंग्टनची कुऱ्हाड सपासप चालवणे सुरू झाले. परिणामी बाजार आणखी बिथरला. या पार्श्वभूमीवर जागतिक पातळीवर अर्थविकासाचे आशेचे एकमेव केंद्र म्हणून भारताकडे पाहणारेही भारताविषयी चिंता व्यक्त करू लागलेले दिसतात. यात विद्यामान केंद्र सरकारचे समर्थक गणले जाणारे वित्तवेत्तेही आहेत, ही बाब महत्त्वाची. केंद्रीय अर्थसंकल्प चार दिवसांवर आलेला असताना या वास्तवाची दखल घेणे आवश्यक ठरते. त्यात पहिल्या क्रमांकावर आहे रुपयाचे निरंतर घसरणे. एकेकाळी रुपयाची किंमत डॉलरच्या तुलनेत ६० रुपयांस स्पर्श करू लागली की बॉलीवूडच्या तारेतारकांपासून अर्थयोगतज्ज्ञ बाबा-बापूंपर्यंत सर्व चिंता व्यक्त करू लागत. त्यातले काही वाचाळ रुपयाच्या घसरण्यासाठी अर्थतज्ज्ञ पंतप्रधान मनमोहन सिंग यांस बोल लावत. आता रुपया ८५ चा टप्पा पार करून ८६ ला स्पर्श करून आला तरी हा वर्ग हूं की चूं करताना दिसत नाही. केंद्राच्या आध्यात्मिक ताकदीची जाणीव हे या एकेकाळच्या बोलघेवड्या वर्गाच्या मौनामागचे कारण असावे. पण हा वर्ग दिवसागणिक नवनवा तळ गाठणाऱ्या रुपयाबाबत शांत होता तरी रिझर्व्ह बँक आपली सर्व ताकद पणास लावून रुपयाचे घसरणे थांबवण्याच्या प्रयत्नात होती. ते प्रयत्न काही प्रमाणात अंगाशी आले. याचे कारण आपल्या तिजोरीतले डॉलर्स पणास लावून रुपयाचे मूल्य राखण्याच्या प्रयत्नात रिझर्व्ह बँकेने आपल्या तिजोरीतील २०,००० ते २२,००० कोटी डॉलर्स (२०० ते २२० बिलियन डॉलर्स) रकमेची माती केली. आणि इतके करूनही डॉलरचे वधारणे काही थांबलेले नाही. म्हणजे रुपयाचे आणखी अवमूल्यन अटळ. त्यात ट्रम्प यांच्या सत्तारोहणानंतर त्या देशातील व्याजदरांतही वाढ होऊ लागल्याने अनेक जण आपल्या बाजारातील गुंतवणूक काढून अमेरिकेत करू लागले. म्हणजे रुपयाच्या मूल्यावर आणखी दबाव येत असताना रिझर्व्ह बँकेस रुपयाची मुक्त घसरण पाहण्याखेरीज आणखी काही करण्याची सोयही नाही. जे करायचे होते ते संकट तीव्र व्हायच्या आधीच करून झाले आणि केलेले सर्व वाया गेले. बाजार सलग घसरताना दिसतो त्याचे कारण हे. त्याच वेळी नवीन गुंतवणुकीबाबत मात्र आपले उद्योगपती हातावर हात घेऊन शांत बसलेले दिसतात. त्यांचेही बरोबर म्हणायचे. कारण गुंतवणूक करा, हात सैल सोडा या अर्थमंत्र्यांच्या आवाहनापलीकडे गुंतवणुकीसाठी आवश्यक धोरणसातत्य अजिबात नसल्याने ते तरी काय करणार. अलीकडे केंद्र सरकारचेच अर्थसल्लागार अनंत नागेश्वरन यांनी एका परीने केंद्राच्या धोरणावरच टीका केली जेव्हा त्यांनी ''आम्ही आमच्या हाताने कारखानदारी मोडीत काढू लागलेलो आहोत'' अशा अर्थाचे विधान केले. नागेश्वरन यांचा रोख होता कालबाह्य अशा जमीन हस्तांतरविषयक कायद्यांवर. आज आपल्या देशात उद्योगांची निम्म्यापेक्षा अधिक ऊर्जा जमिनीपासून सर्व परवाने मिळवण्यातच जाते. या कायद्यांत सुधारणेची गरज धोरणकर्त्यांनी अनेकदा व्यक्त केलेली आहे. पण ते तेवढ्यापुरतेच. नुसती शब्दसेवा. प्रत्यक्ष कृतीच्या नावे भोपळा. तीच बाब कामगार कायद्यांबाबतही. अनेक राज्यांत त्यांची अंमलबजावणीची सुरुवातही नाही आणि ती व्हावी यासाठी केंद्र सरकार काही करतानाही दिसत नाही. एरवी राज्यांच्या अधिकारांवर ऊठसूट अतिक्रमण करणारे केंद्र सरकार औद्योगिक प्रगतीसाठी या महत्त्वाच्या विषयावर मात्र बघ्याची भूमिका घेते. कारण? राजकीय परिणामांची भीती. आपण कामगारविरोधी दिसू वा ठरवले जाऊ या भीतीने केंद्र सरकार कामगार कायद्यांतील सुधारणा अमलात आणत नसून त्याचा मोठा फटका उद्योगांच्या विस्तारास बसताना दिसतो. आज एखाद्या भव्य प्रकल्पाची उभारणी हाती घेण्याऐवजी अनेक उद्योजक १०० पेक्षा कमी कामगार नेमावे लागतील याची खबरदारी बाळगून अनेक छोटे कारखाने काढण्यास प्राधान्य देतात. म्हणजे हजारभर कामगारांस रोजगार मिळेल असा कारखाना काढण्याऐवजी ९९ जणांना घेऊन १० लहान-लहान कारखाने काढणे. असे केल्याने जमीन हस्तांतरही सुलभ होते आणि कामगार कायद्यातील पळवाटांचाही आधार घेता येतो. उद्योजकांसाठी ही सोय असेल. पण असे केल्याने राज्याचे नुकसान होते. याचा अर्थ २४ वर्षांच्या एका तगड्या पैलवानास चार-चार वर्षांची सहा बालके हा पर्याय असू शकत नाही. हे केंद्र सरकारला जेवढ्या लवकर कळेल तितके बरे. या सगळ्याच्या जोडीने राजकीय दबावापोटी लोकानुनयाची सुरू झालेली स्पर्धा. ती कमी होण्याची चिन्हे नाहीत. कारण पार्लमेंटपासून पंचायतीपर्यंत प्रत्येक निवडणूक आपण आणि आपणच जिंकायला हवी, ही ईर्षा. तत्त्वत: ईर्षा वाईट नाही. पण त्याची किंमत काय आणि कोण चुकती करणार हा प्रश्न. नागरिकांचा रोष नको म्हणून केंद्राने करोनाकाळात सुरू केलेली मोफत धान्य योजना अद्यापही बंद केलेली नाही. उलट तिची व्याप्ती वाढवत नेली. आज जवळपास ८० कोटी नागरिकांस हे मोफत धान्य दिले जाते. म्हणजे देशाच्या लोकसंख्येच्या साधारण ६० टक्के नागरिकांस याचा फायदा मिळतो. तेही एक वेळ क्षम्य. पण एका बाजूने आर्थिक महासत्ता होत असल्याच्या वल्गना करायच्या आणि ८० कोटी जनतेस मोफत शिधावाटप करायचे यातील विरोधाभास सरकार विचारात घेत नाही, ही बाब अक्षम्य. कारण इतक्या जणांस मोफत शिधावाटप अद्यापही करावे लागत असेल तर अर्थविकासाचे सिंचन सर्वदूर समप्रमाणात झालेले नाही, असा त्याचा अर्थ. आगामी अर्थसंकल्पात या सगळ्याचा विचार निर्मला सीतारामन यांस करावा लागेल. देशातील आर्थिक आव्हानांस आता ट्रम्प यांच्या रूपाने जागतिक संकटाची जोड मिळालेली असल्याने आपली परिस्थिती अधिक गंभीर ठरते. हा असा संकटकाल नव्या संधींचा. त्याचे अलीकडच्या काळातील ताजे उदाहरण म्हणजे १९९१ साली पंतप्रधान नरसिंह राव यांनी तत्कालीन अर्थमंत्री मनमोहन सिंग यांस हाताशी धरून रेटलेल्या सुधारणा. विद्यामान अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यासमोर ही सुधारणा संधी चालून आली असून ती त्या साधणार का, यावर देशाच्या अर्थव्यवस्थेची दिशा आणि वेग अवलंबून असेल. म्हणून सीतारामन या सिंग होणार का, हा प्रश्न.

# देवेंद्र फडणवीसांचा बीड दौरा ठरला

## सुरेश धस यांच्या आष्टीत विकासकामांसाठी विशेष उपस्थिती!

बीड, (प्रतिनिधी):- संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणी बीड जिल्हा गेल्या काही दिवासांपासून चर्चेत आहे. याचदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बीड जिल्ह्याचा दौरा करणार आहेत. भाजपचे आमदार सुरेश धस यांच्या आष्टी मतदारसंघात विकासकामांच्या उद्धाटनासाठी देवेंद्र फडणवीस येणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पाच फेब्रुवारी रोजी बीड जिल्ह्याच्या दौरा करणार आहेत. भाजपा आमदार सुरेश धस यांच्या आष्टी मतदारसंघातील कुंटेफळ तलावाच्या कामाच्या उद्धाटन प्रसंगी देवेंद्र फडणवीस यांची विशेष उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमानंतर देवेंद्र फडणवीस विविध विभागाचा आढावा घेणार आहेत. त्याचबरोबर मच्छिंद्रनाथ संस्थानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विविध विकास कामांचा भूमिपूजन सोहळा होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ५ तारखेला आष्टीत येतायत. मुख्यमंत्री कार्यक्रमासाठी मतदारसंघात येणार आहेत, असं सुरेश धस म्हणाले. बीड जिल्ह्यातील पोलीसांच्या बदल्या करा. तेथील पोलीसांची मटक्यावाल्यासोबत अर्धी पार्टनरशिप आहे, असा आरोप



सुरेश धस यांनी केला. काही पोलीस एकाच एका ठिकाणी २०- २० वर्ष आहेत. याची माहिती मी मुख्यमंत्र्याना दिलीय. परळीतील अवैध राखेचे साठे आहेत याची यादी माझ्याकडे आहे, मी पोलीसांना देणार आहे. महादेव गित्ते हे मागचं प्रकरण आहे, वाल्मिक अण्णा हा एकच आहे. मागे दुसरा वाल्मिक अण्णा पोलीसांना दाखवला आहे.वाल्मिक अण्णा हा एकच आका आहे, आकाचा आका दुसरा आहे. कोण त्या महिल्या अधिकारी आहे, ज्यांना वाल्मिक अण्णांनी फोन केला होतो, याचा मिडीयाने तपास करावं. कृष्णा आंधळेच्या बाबतीत मी पोलीसांकडून माहिती घेतली. तो गरिब आहे, मात्र त्यावर अनेक गुन्हे आहेत. सौरभ भोंडवे नावाचा मुलगा आहे, त्याचे वडील माझ्याकडे आले होते, अशी माहिती देखील सुरेश धस यांनी दिली. दरम्यान, एका रस्त्याच्या कामासाठी ५-५ वेळा पैसे उचलले आहेत. परळीत रस्त्याची काम नाहीत. मात्र कोट्यावधी रुपये उचलली आहेत, असा दावाही सुरेश धस यांनी माध्यमांशी बोलताना केला.

# भतानवाडीत चोरट्यांनी दोन घरे फोडली

## सव्वा तीन लाखांचा ऐवज लंपास

अंबाजोगाई, (प्रतिनिधी):-अंबाजोगाई तालुक्यातील भतानवाडी येथे अज्ञात चोरट्यांनी दोन घरे फोडली. अंगद राम भताने आणि ईश्वर पांडुरंग भाताने यांच्या घरातून चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ३ लाख २७ हजारांचा मुद्देमाल लंपास केला. ङ्गङ्गअंगद राम भताने हे भतानवाडी येथे शेती करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. सोमवारी (दि.२७) भताने यांची पत्नी आणि मुलगी गंगाखेड येथे गेले असल्यने ते घरी एकटेच होते. रात्री शेताला पाणी देण्यासाठी घराबाहेर पडणार असल्याने त्यांनी घराचे मुख्य गेट उघडे ठेवले होते. रात्री भताने आपल्या रूममध्ये झोपले असताना, त्यांना कोणीतरी गेटमधून आत आल्याचा आवाज आला. त्यांनी दरवाजाजवळ जाऊन पाहिले असता, तोंडाला बांधलेला आणि हातात चाकू असलेला एक माणूस दिसला. त्याच्यासोबत आणखी तीन अनोळखी इसम बाहेर उभे होते. भताने घाबरून रूमचा दरवाजा आतून बंद केला. यावेळी चोरट्यांनी त्यांच्या घरातील दोन पेट्या आणि एक बॅग चोरून



नेल्या. तसेच, त्यांच्या घराच्या पाठीमागे राहणारे ईश्वर भताने यांच्या घरातूनही चोरट्यांनी ऐवज लंपास केला. दोन्ही घरातून चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण ३ लाख २७ हजारांचा मुद्देमाल घेऊन पोबारा केला. बर्दापूर पोलीस या घटनेचा तपास करत आहेत. दरम्यान, या घटनेमुळे भतानवाडी गावात भीतीचे वातावरण पसरले आहे. गावकऱ्यांनी पोलिसांना लवकरात लवकर चोरट्यांना पकडण्याची मागणी केली आहे.

# नांदेडच्या तरुणाचा परळीत जीवन संपविण्याचा प्रयत्न

## स्वत:च्याच गळ्यावर ब्लेडने केले वार

परळी, (प्रतिनिधी):- पुण्याहून नांदेडकडे जात असलेल्या तरुणाने परळी रेल्वे स्थानकावर उतरून परळीच्या बस स्थानकाजवळ आत्महत्येच प्रयत्न केला. दत्ता दीपक गोंडेकर (वय २४ वर्ष राहणार नांदेड) असे सदरील युवकाचे नाव आहे. बुधवार दिनांक २९ जानेवारी रोजी दुपारच्या वेळी स्वत:च्या गळ्यावर ब्लेडने वार केले त्यामुळे दत्ता गोंडेकर हा रक्तबंबाळ झाला होता अशा अवस्थेत त्यास परळीच्या शहर पोलीस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक व्यंकट भताने यांनी तातडीने परळीच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. परळीच्या उपजिल्हारुग्णालयात प्राथमिक उपचार करून दुपारी पाचच्या सुमारास अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले असून



तेथे उपचार चालू आहेत. या संदर्भात दत्ता गोंडेकर यांच्या नातेवाईकांना पोलिसांनी माहिती कळविली आहे. दत्ता दीपक गोंडेकर हा पुण्याहून परळीला रेल्वेने आला होता. तो आपल्या गावी नांदेडला जाणार होता. परंतु परळीच्या बसस्थानक जवळ गळ्यावर ब्लेडने वार करून जखमी करून घेतले असल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. नेमका हा काय प्रकार आहे ? कशामुळे त्याने हा प्रकार केला? याची माहिती प्राप्त होऊ शकली नाही. पोलिसांचा तपास सुरू आहे.

# राज्याच्या हवामानात चढ-उतार



## राज्यभर रात्री-पहाटे थंडी,दिवसा उकाडा

मुंबई, (वृत्तसेवा):-देशासह राज्यात सध्या हवामानात मोठे बदल होत असून, तापमानात चढ-उतार दिसून येत आहे. मुंबईसह इतर भागांत वातावरणात लक्षणीय बदल झाले आहेत. रात्रीच्या वेळेस आणि पहाटेच्या दरम्यान थंडी जाणवते, तर दिवसा प्रचंड उकाडा नागरिकांना सहन करावं लागत आहे. हवामान विभागानुसार ही स्थिती पुढील आठवडाभर कायम राहण्याची शक्यता आहे. बदलत्या हवामानाचा नागरिकांच्या आरोग्यावर थेट परिणाम होत आहे, आणि यामुळे आरोग्याच्या बाबतीत अधिक काळजी घेण्याची आवश्यकता आहे. नागरिकांना यासाठी सावधगिरी बाळगण्याचं आवाहनही करण्यात आलं आहे. राज्याच्या काही भागांत किमान तापमानात वाढ झाली आहे, ज्यामुळे थंडीचा प्रभाव कमी होत असल्याचं दिसत आहे. त्याचबरोबर, दिवसा सूर्याच्या कडक उष्णतेमुळे अनेकांना असह्य होरपळ सहन करावी लागत आहे. या बदलत्या हवामानामुळे नागरिकांची अडचणी वाढत असून, हवामानातील असंतुलन त्यांच्या दैनंदिन जीवनावर प्रभाव टाकत आहे. ही परिस्थिती सध्या अनेकांसाठी त्रासदायक ठरत आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीमध्ये सांगितले की, सध्या पश्चिमी वाऱ्यांचा वेग वाढला आहे, ज्याचा सर्वाधिक प्रभाव वायव्य भारतात दिसून येत आहे. या बदलामुळे उत्तर भारतातील मैदानी भागांमध्ये गारठा कमी झाला आहे. राज्यातील वातावरणात मात्र दिवसभरात हिवाळा आणि उन्हाळा या दोन्ही ऋतूंचा अनुभव नागरिकांना विविध प्रहरांमध्ये घेता येत आहे. हवामानाची ही स्थिती काही काळासाठी कायम राहण्याची शक्यता असून, मुंबई, उपनगर, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातही हेच वातावरण दिसणार आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, दक्षिणेकडील काही राज्यांमध्ये बर्फवृष्टी होण्याची शक्यता आहे. तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि केरळमध्ये ३० जानेवारी ते १ फेब्रुवारीदरम्यान मुसळधार पाऊस होऊ शकतो, ज्यामुळे या ठिकाणी थंडी वाढेल. मंगळवारी सकाळी दिल्लीत किमान तापमान ९.०५ अंश सेल्सिअस नोंदवले गेले, तर कमाल तापमान १८.०१ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे. दिल्ली-एनसीआरमध्ये सकाळी आणि संध्याकाळी थंडी जाणवत आहे, पण दुपारी उष्णतेमुळे नागरिकांना त्रास होत आहे. महाराष्ट्रात किमान आणि कमाल तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअस वाढ होईल.

## पान १ वरून

### बीड जिल्हा मध्यवर्ती...

झाले असून आधुनिक तंत्रज्ञान आणि तांत्रिक बाबींसाठी सक्षम नाही, त्यामुळे भौतिक, तांत्रिक सुविधा निर्मितीसाठी बँकेला १५ कोटी रुपये मदत राज्य सरकारने करावी, अशी मागणी धनंजय मुंडे यांनी केली असून, याबाबतचा प्रस्ताव पाठवावा, त्यावर निर्णय घेऊ, असे अजितदादा पवार यांनी स्पष्ट केले. पंजाबराव देशमुख कृषी सवलत योजनेप्रमाणे विविध योजनांच्या सवलतीच्या माध्यमातून बीड जिल्हा बँकेचे सुमारे ३२ कोटी रुपये राज्य शासनाने अदा करणे बाकी असून ही रक्कम शासनाने उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही धनंजय मुंडे यांनी केली असता, सदर रक्कमा जिल्हा बँकेला ३१ मार्चच्या आधी उपलब्ध करून दिल्या जातील, असा निर्णयही अजितदादा पवार यांनी घेतला. या बैठकीस अर्थ व नियोजन तसेच सहकार विभागाचे अपर मुख्य सचिव, सहकार आयुक्त, नाबार्डचे सी जी एम, त्याचबरोबर शिखर बँकेचे व राज्य सहकारी बँकेचे वरिष्ठ अधिकारी, बीड चे जिल्हाधिकारी अविनाश पाठक, प्रशासकीय मंडळ आदी उपस्थित होते. वसुली सह दर्जा उन्नती साठी कार्य करणाऱ्या जिल्हा बँकेच्या प्रशासक मंडळाचे अजितदादांनी यावेळी कौतुक केले. तसेच जिल्हाधिकारी यांच्या मदतीला आता बँकेचा कारभार पाहण्यासाठी सहकार विभागाकडून एका तज्ञ अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार असल्याचेही अजितदादा पवार यांनी स्पष्ट केले.

### सुरेश धस यांनी...

उचलली. अंबेजोगाईच्या कार्यकारी अभियंत्याने बिले दिली होती. परळी मतदार संघात १३/१२/२०२१ ते ३१/३/२०२२ कालावधीत परळी मतदारसंघात ७३ कोटी ३६ लाख बिले उचलली आहेत. माननीय पालकमंत्री आणि सामजिक न्यायमंत्री असताना ही बिले उचलली, असं म्हणत सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांच्यावर निशाणा साधला. संजय मुंडे हा अधिकारी निवृत्त झाला, पण ते सापडत नाहीत, डेप्युटी इंजिनियर गायब आहे. दादांनी एवढं प्रेम करु नये की ७३ कोटीची बिल उचलली जातील. मी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली नाही. पण उद्या होणाऱ्या बैठकीत हे मुद्दे मांडणार आहे, असंही सुरेश धस म्हणाले.

### दगाफटका कराल...

सगळे मेल्यावर सांगू नका दहा दिवसांनी सांगितल्यापेक्षा आजच संध्याकाळपर्यंत सांगून टाका, म्हणजे उपोषण सोडून देऊन दुसरा मार्ग स्विकारता येईल. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा उपोषणास्त्र उगारलंय. आज या आंदोलनाचा पाचवा दिवस आहे.. सरकार जरांगेंकडे जाणून-बुजून दुर्लक्ष करत असल्याचा आरोप पुण्यातील मराठा आंदोलकांनी केलाय.या आंदोलनात १० दिवस मराठा आंदोलनकर्ते उपोषण करणार असून त्याचबरोबर येत्या दोन दिवसात जर सरकारने या आंदोलनाकडे गांभीर्याने पाहिलं नाही. तर राज्यभर मराठा समाजाचा आक्रमक आंदोलन पाहायला मिळेल असा इशारा देखील यावेळी आंदोलकांनी दिला आहे.

### पदोन्नती करूनच...

समायोजन करणार आहे. परंतु मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व पदवीधर शिक्षकांची पदोन्नती अगोदर केल्यास सहशिक्षकांची पदे रिक्त होतील जेणेकरून अतिरिक्त शिक्षकांना समायोजनासाठी जागा उपलब्ध होतील आण त्यांच्यावर समायोजनाबात कुठलाही अन्याय होणार नाही. परंतु शिक्षण विभागाकडून घाई घाईने पदोन्नती न करताच समायोजन करण्याचा घाट घातल्याने जिल्ह्यातील अनेक शिक्षक-शिक्षिका बांधवांवर अन्याय होईल. त्यामुळे दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी होणारी समायोजन प्रक्रिया स्थगित करून अगोदर मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व पदवीधर शिक्षक यांची पदोन्नती करण्यात यावी अशी मागणी आमदार संदीप क्षीरसागर यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे.

### कॉम्रेड गोविंद पानसरे...

निर्देश दिले आहे. न्यायमूर्ती ए. एस. किल्लोर यांच्या एकलपीठाचा निर्णय घेतला आहे. खरं तर गोविंद पानसरे यांच्या हत्या प्रकरणातील सचिन अंदुरे, गणेश मिस्कीन, अमित देगवेकर,भरत कुरणे आणि वासुदेव सूर्यवंशी या पाच आरोपींना २०१८ ते २०१९ दरम्यान अटक करण्यात आली होती. त्यामुळे गेल्या सहा वर्षापासून आपण अटकेत आहोत आणि अद्याप खटला सूरू आहे. नजीकच्या काळात तो संपण्याची शक्यता कमी आहे. असा दावा करून आरोपींनी उच्च न्यायालयात जामीनासाठी धाव घेतली होती. त्यानुसार न्यायमूर्ती ए. एस. किल्लोर यांच्या एकलपीठाने अटक झाल्यापासून आरोपी तुरुंगातच आहेत. खटला लवकर निकाली लागण्याची शक्यता नाही. याशिवाय तपासात लक्षणीय प्रगती न झाल्यामुळे आरोपी जामीनासाठी पात्र असल्याचा कोर्टाचा निर्वाळा दिला होता. त्यामुळे कोर्टाने सचिन अंदुरे, गणेश मिस्कीन, अमित देगवेकर,भरत कुरणे आणि वासुदेव सूर्यवंशी या पाच आरोपींना जामीन मंजूर केला होता. तसेच याच प्रकरणातील आणखी एक आरोपी वीरेंद्रसिंह तावडे याच्या जामीन अर्जाचा स्वतंत्रपणे आढावा घेण्याचे हायकोर्टाकडून निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे त्यांच्याबाबत कोर्ट काय निर्णय घेते? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. त्यामुळे आता कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्या प्रकरणात सहाही आरोपींना मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. पण या जामीननंतर दोन गोष्टी खूप महत्वाच्या आहेत. एक म्हणजे कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्येचं गुढ अजूनही उलगडलं नाही आहे. अजूनही हत्येच गुढ उलगडण्यात तपास यंत्रणांना यश आलेलं नाही आहे. तसेच तपास यंत्रणेने दाखल केलेले पुरावे यावर कोर्ट देखील असमाधीनी आहे. त्यामुळेच या पानसरे यांच्या हत्येचा उलगडा होण्यास उशीर होतोय.

### महाकुंभमेळ्यात चेंगराचेंगरी...

कुटुंबियांप्रती शोक व्यक्त केला होता. मात्र, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या घटनेत लोक गंभीर जखमी झाल्याचे सांगितले होते. प्रयागराज मेळा प्रशासनाच्या वतीने डीआयजींनी पत्रकार परिषद घेऊन चेंगराचेंगरीच्या घटनेची संपूर्ण माहिती दिली. घटनेनंतर पोलीस-प्रशासनाची टीम लगेच सक्रिय झाल्याचे त्यांनी सांगितले. जखमींच्या उपचारासाठी ग्रीन कॉरिडॉर करण्यात आला. जखमींना रुग्णवाहिकेतून रुग्णालयात नेण्यात आले. चेंगराचेंगरीत ९० जण जखमी झाल्याचे त्यांनी सांगितले. त्यापैकी ३० जणांचा मृत्यू झाला. बॅरिकेड तुटल्याने हा भीषण अपघात झाल्याचे त्यांनी सांगितले. अमृतस्नानाची गर्दी पाहता व्हीव्हीआयपी प्रोटोकॉल पुढे ढकलण्यात आल्याचे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. घटनेच्या कारणांचा उल्लेख करताना डीआयजी म्हणाले की, रात्री उशिरा संगम नाक्यावर मोठा जमाव जमला होता. आखाड्यांच्या शाही स्नानासाठी तेथे बॅरिकेड्स लावण्यात आले होते. त्यावर दबाव आल्याने बॅरिकेड तुटले. त्यामुळे लोक पडले आणि चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली. रात्री उशिरापर्यंत मोठ्या संख्येने भाविक पॉलिथिनने झाकून पडले होते. जमाव त्यांच्या अंगावरून गेला.

### माझ्या नैतिकेनुसार...

अशी मागणी केली जात आहे. राजीनाम्याचा दबाव वाढत असतनाच मुंडे हे दिल्ली दौऱ्यावर गेले आहे. या दरम्यान त्यांनी केंद्री मंत्री पल्हाद जोशी यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी प्रत्रकारांशी संवाद साधला. या प्रकरणात सुरुवातीपासूनच मला टार्गेट केले जात असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. या संदर्भात बोलताना धनंजय मुंडे म्हणाले की, सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील दोषींना कडक शिक्षा झाली पाहिजे. या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा करण्याची माझी देखील मागणी असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

## ३१ जानेवारी पर्यंत विद्यावेतन देण्यात यावे नसता तीव्र आंदोलन
## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी यांचे उपविभागीय अधिकारी यांना पत्र

# युवा प्रशिक्षणार्थ्यांचे विद्यावेतन देण्यास कौशल्य विभागाकडून टाळाटाळ



**माजलगाव । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत प्रशिक्षणार्थी सहा महिन्याकरिता प्रशिक्षण घेत आहेत. बहुतांशी जिल्ह्यातील प्रत्येक प्रशिक्षणार्थी हा प्रशिक्षक (ट्रेनी टीचर ) म्हणून तन मनाने विद्यादानाचे काम करत आहे. आज या कार्य प्रशिक्षण प्रणालीला पाचवा महिना लागला आहे. आपला कार्यकाळ सहा महिन्याचा असल्याने ते प्रशिक्षणार्थी हवालदिलं झाले आहेत. प्रशिक्षणार्थ्यांनी पाच महिन्याच्या प्रशिक्षण काळात जे विद्यादानाचे काम केले आहे त्याचा मोबदला पण त्यांना आजतागायत देण्यात आला नाही तालुकास्तरावरील संबंधित अधिकाऱ्याची मानधनाबाबत विचारणा केली असता त्यांच्याकडून जिल्हा कौशल्य विभागातील कर्मचाऱ्याकडून आपल्या ऑनलाईन मध्ये डिफॉल्ट असल्याचे सांगण्यात येत आहे .प्रत्येक वेळी आपली ऑनलाइन प्रणाली चुकीची असल्याचे निदर्शनास आणून देण्यात येत आहे. असे बोलले जात आहे कित्येकदा जिल्हा कौशल्य विभागाकडून ऑनलाईन झालेले फाईल त्या डिलीट करण्यात येत आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री युवा प्रशिक्षक (ट्रेनी टीचर) यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. तरी संबंधित विभागास योग्य त्या सूचना करून मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी यांचे विद्यावेतन देऊन तात्काळ निर्णय घ्यावा नसता दिनांक ३१ जानेवारी रोजी संबंधित कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी यांच्या मार्फत देण्यात आला या निवेदनावर शरद पवार, दिगंबर बादाडे, अविनाश क्षिरसागर, छाया शिंगाडे, पूजा शिंदे , अश्विनी फुंदे , विशाखा वक्ते , सम्रता पोटभरे , परमेश्वर नरसाळे, अमोल चव्हाण , श्रुती कदम, गोविंद आव्हाड, विजय पवार, अजय डाके, शेख आयशा, लक्ष्मण पवार , अंगद गरड, महादेव गरड, साळवे सुकेशनी आदीसह प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. ए. डी. कुलकर्णी यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६० / २०२५, शंकर विरूध्द निरंक**
**(मार्फत ॲड. मेघारे एस. एल. गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे आबाई शिवनाथ कोल्हे हे दिनांक ०६/०७/२०१४ रोजी मौजे संतोष नगर, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झालेले आहेत. तसेच मयत नं. २. नामे शिवनाथ लहानु कोल्हे हे दिनांक ०४/०६/२०२२ रोजी संतोष नगर, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार १. शंकर शिवनाथ कोल्हे वय ४७ वर्षे, धंदा शेती रा. संतोष नगर, गेवराई, ता. गेवराई जि. बीड २. शाम शिवनाथ कोल्हे वय ४२ वर्षे, धंदा शेती, रा. सदर यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता **मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २** प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत **मयत नामे १. आबाई शिवनाथ कोल्हे व २. शिवनाथ लहानु कोल्हे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक २९/०१/२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २७/०२/२०२५

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, गेवराई**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीम. डी. के. पाटील साहेब ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १२५/२०२५, सुनंदा विरुध्द निरंक, (ॲड. शिंदे जी.पी.)**

अर्जदार :- १) सुनंदा भ्र. वसंतराव नाईकनवरे वीर वय ६६ वर्षे धंदा घरकाम, २) जयदत्त वसंतराव नाईकनवरे वय ४० वर्षे धंदा व्यापार, ३) लक्ष्मीकांत पि.वसंतराव नाईकनवरे वय ३८ वर्षे धंदा व्यापार, सर्व रा. स्वराज्य नगर, बार्शी रोड, बीड ता.जि.बीड

विरुध्द निरंक

**मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र** (Heirship Certificate) **मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे वसंतराव बाबुराव नाईकनवरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत नामे **वसंतराव बाबुराव नाईकनवरे** रा. स्वराज्य नगर, बार्शी रोड, बीड ता. जि.बीड यांचा मृत्यु दिनांक : ११/१२/२०२४ रोजी बीड, ता. जि. बीड येथे झाला. अर्जदार क १ या मयाताच्या पत्नी आहेत व अर्जदार क २ व ३ हे मयताचे मुले आहेत. मयतास सदर अर्जदारांशिवाय ईतर कुणीही वारस नाही. वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत वसंतराव बाबुराव नाईकनवरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/०१/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.
सदर **प्रकरणाची पुढील तारीख दिनांक** ०४/०३/२०२५.

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती टी. ए. आसरकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १२२५/२०२४, ॲड. वाय. आर. शेळके**
**कारभारी व ईतर विरुध्द निरंक**

अर्जदार :-(१) कारभारी आप्पा यादव, वय ४८ वर्ष, धंदा शेती, पत्ता - बेलवाडी पो. पिंपळनेर ता.जि.बीड, (२) प्रभु आप्पा यादव, वय ६५ वर्ष, धंदा शेती, बेलवाडी पो. पिंपळनेर ता.जि.बीड

विरुध्द

**मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत रेशमाबाई भ्र. आप्पा यादव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मयत रेशमाबाइ भ्र. आप्पा यादव यांचा मृत्यु दि. १५/०५/२०१६ रोजी** बेलवाडी. पो. पिंपळनेर, ता.जि. बीड येथे झाला आहे. अर्जदारक. १ व २ हे मयताचे मुले आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास सम जाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयाच हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत रेशम ाबाई प्र. आप्पा यादव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक २७ माहे ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि.०३/०३/२०२५

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती टी. ए. आसरकर ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ११४६/२०२४, ॲड. वाय. आर. शेळके**
**मिरा उर्फ मिराबाई व ईतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- (१) मिरा उर्फ मिराबाई गोरख लोणकर, वय ५१ वर्ष, धंदा घरकाम, पत्ता - शहाजानपुर-लोणी ता. जि. बीड, (२) महारुद्र गोरख लोणकर, वय २८ वर्ष. धंदा शेती, शहाजानपुर-लोणी ता. जि. बीड

विरुध्द

**मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत गोरख श्रीवर लोणकर** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत गोरख श्रीधर लोणकर यांचा मृत्यु दि. ०६/०६/२०२१ रोजी लोणी शहाजानपूर, ता.जि. बीड येथे झाला आहे. अर्जदार क्र. १ मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत गोरख श्रीधर लोणकर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १५ माहे ऑक्टोबर २०२४ रोजी माझ्या सहीने व शिक्क्यानिशी दिले.
सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०३/०३/२०२५

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा.श्री. ओ.एन. मंत्री साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १४७/२०२५, (ॲड. शेळके)**
**गिताबाई भ्र. बाजीराव घुमरे व ईतर विरूध्द निरंक**

अर्जदार- १. गिताबाई भ्र. बाजीराव घुमरे, वय ६० वर्षे, धंदा - घरकाम, २. आत्माराम पि. बाजीराव घुमरे, वय ३५ वर्षे, धंदा शेती, वरील दोघे रा. घाटजवळा, ता.जि. बीड, ३. आशाबाई भ्र. कल्याण गुंदेकर, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. आंबेसावळी, ता. जि. बीड, ४. सविता भ्र. नितीन डोंगरे, वय ३३ वर्षे, धंदा घरकाम, रा. देवळा, ता. वडवणी जि.बीड, ५. अविधा भ्र. पांडुरंग कदम, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम,रा. येळंबघाट ताच. जि. बीड ६. तेजाश्री भ्र. जगदिश कदम, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा. हिंगणेवाडी, ता. बारामती, जि. पुणे **विरुध्द** निरंक

**मागणी- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत बाजीराव पि. ज्ञानोबा घुमरे, यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी **मयत बाजीराव पि. ज्ञानोबा घुमरे, यांचा मृत्यु दिनांक** २६/०७/२०२४ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत बाजीराव पि. ज्ञानोबा घुमरे, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत बाजीराव पि. ज्ञानोबा घुमरे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/०१/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.
**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि.** २८/०२/२०२५ आहे.

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ३७/२०२५**
**साखरबाई ज्ञानोबा मुंडे विरुद्ध ग्रा पं. भवानवाडी (ॲड. सचिन खाडे)**

पहा :- २.साखरबाई पि. ज्ञानोबा मुंडे, रा. भवानवाडी ता. जि. बीड.

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून

आर्जदार साखरबाई पि. ज्ञानोबा मुंडे -यांचा जन्म दिनांक-०९/११/१९६२ रोजर झालेला असुन त्यांचे जन्मची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार कार्यालय/ न.प.कार्यालयास भवानवाडी

यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे भवानवाडी ता.जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/०१/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १३/०२/२०२५ ही आहे.

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**तहसिलदार बीड**
**करीता**

शिक्का

## जाहीर प्रगटन

**अवसायक (खालील तपशिलाप्रमाणे)**
**कार्यालय,सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था ता वडवणी**
**एस.बी.आय.बँकेच्या शेजारी,वडवणी. ता.वडवणी, जि.बीड**
**दि.२९/०१/२०२५**

**मा.सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था ता.वडवणी जि.बीड यांनी त्यांचे कार्यालयीन आदेशाव्दारे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ मधील तरदुन्वये खालील सहकारी संस्थेचे अंतिम आदेश निर्गमित केलेले असुन त्यावर खालील तपशिल प्रमाणे अवसायकाची नियुक्ती केलेली आहे त्यानुषंगाने खालील सहकारी संस्थांची अवसायन कार्यवाही पुर्ण करणेसाठी महाराष्ट्र सहारी संस्थांचे नियम १९६१ मधील नियम ८९ (४) मधील तरतुदीप्रमाणे खालील सहकारी संस्थांच्या सर्व संबंधितांना याव्दारे नोटीस देऊन कळविण्यात येते की, त्यांना संस्थेस देणे असल्यास अथवा संस्थेचे येणे असल्यास या नोटीसीच्या दिनांकापासुन दोन (०२) च्या आत त्यांचे येणे रकमे बाबत हरकती / आक्षेप पुराव्यानिशी संबंधित अवसायकाकडे दाखल करावे आणि देणे रक्कम तात्काळ संबंधित अवसायकाकडे जमा कराव्यात वरील मुदतीत संस्थेचे देणे / येणे रकमांचे अनुषंगाने संबंधित अवसायकाकडे पुराव्यांनिशी कागदपत्रे दाखल न केल्यास संस्थेस कोणचेही देणे नाही अथवा येणे नाही असे समजण्यात येऊन अवसायन कार्यवाही पुर्ण करण्यात येईल तसेच संस्थेच्या येणे असलेल्या रकमा संबंधित अवसायकाकडे जमा न केल्यास त्या कायदयातील तरतुदीप्रमाणे वसुल करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपावर विचार केला जाणार नाही.**

**प्रपत्र ब - अवसायनातील संस्थेची यादी माहे डिसेंबर - २०२४**

| अक्र | अवसायनातील संस्थेचे नाव | अवसायनातील अंतिम आदेश दिनांक | अवसायकाचे नाव | अंतिम सभा दिनांक | सभेचा वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | तालुका सहकारी खरेदी विक्रीसंघ म.वडवणी | ३१/१२/२०१५ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| २ | शेतकरी सहकारी जिनीग व प्रेसिग सहकारी संस्था मर्या.चिंचवण | ३१/१२/२०१५ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| ३ | शेतकरी सहकारी तेलबीया कृर्षी प्रकिया स.म.वडवणी | ३१/१२/२०१५ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| ४ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्थाम.वडवणी | ३१/०३/२०१५ | श्री.आर.डी.शिंदे सहकार अधिकारी श्रेणी-२ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| ५ | अश्विनी मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था म. कवडगांव बु. | ३१/०३/२०१५ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| ६ | प्रियंका महिला ग्रामद्योग सहकारी संस्था म.दुकडेगाव | ३१/०३/२०१५ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| ७ | सावित्रीबाई फुले महीला ग्रामद्योग सहकारी संस्था म. वडवणी | ३१/०३/२०१५ | श्री.आर.डी.शिंदे सहकार अधिकारी श्रेणी-२ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| ८ | सावित्रीबाई फुले महीला मागा.औद्यो. सहकारी संस्था म. वडवणी | ३१/०३/२०१५ | श्री.आर.डी.शिंदे सहकार अधिकारी श्रेणी-२ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| ९ | कुंडलिक विट उत्पादक औद्यो.सहकारी संस्था म.दुकडेगाव | २१/१०/२०११ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| १० | उत्कर्ष मागासवर्गीय औद्योगीक सहकारी संस्था म.वडवणी | २१/१०/२०११ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| ११ | आदर्श दालमिल कृषि प्रक्रया सहकारी संस्था म.वडवणी | २१/१०/२०११ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| १२ | मंकावती सहकारी तेलबिया कृषि प्रक्रीया सहकारी संस्था म. चिंचवण | २१/१०/२०११ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| १३ | राजा हरिश्चंद्र सहकारी जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्था म.चिंचाळा | २१/१०/२०११ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| १४ | जयभवानी सहकारी जिनिंग प्रेसिंग सहकारी संस्था म. देवडी | २१/१०/२०११ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| १५ | गजानन महाराज नागरी सहकारी पतसंस्था म.वडवणी | २१/१०/२०११ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| १६ | राजेसाहेब विद्यालय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. कुप्पा | १७/०१/२०२३ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| १७ | जनता ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या .चिंचवण | १७/०१/२०२३ | श्री.आर.डी.शिंदे सहकार अधिकारी श्रेणी-२ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| १८ | रमाबाई आंबेडकर महिला ग्रा. बि. शेती सह. पतसंस्था मर्या. डुकडेगाव | २६/०७/२०२२ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| १९ | भिमशक्ती मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्या. देवळा | २६/०७/२०२२ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| २० | संत नामदेव मागासवर्गीय औद्योगिक सहकारी संस्था मर्या. बाहेगव्हाण | १७/०१/२०२३ | श्री.आर.डी.शिंदे सहकार अधिकारी श्रेणी-२ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| २१ | वडवणी तालुका खंड औद्योगिक बहुउद्देशिय ग्रामीण सहकारी संस्था मर्या. वडवणी | १७/०१/२०२३ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| २२ | तारामती महिला गृह वस्तु उत्पादक औद्योगिक सहकारी संस्था मर्या. हा.पिंप्री | २६/०७/२०२२ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| २३ | रमाई मागासवर्गीय महिला औद्योगिक सहकारी संस्था मर्या. वडवणी | १७/०१/२०२३ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| २४ | जयभवानी महिला गृह वस्तु उत्पादक औद्योगिक सहकारी संस्था मर्या. चिंचोटी | २६/०७/२०२२ | श्री.आर.डी.शिंदे सहकार अधिकारी श्रेणी-२ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| २५ | संत भगवानबाबा पाणी वापर सहकारी संस्था मर्या. सोन्नाखोटा | १७/०१/२०२३ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| २६ | गहीनीनाथ उसतोड व वाहतुक सहकारी संस्था मर्या. पिंपळारूई | २६/०७/२०२२ | श्री.आर.डी.शिंदे सहकार अधिकारी श्रेणी-२ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| २७ | राजनंदिनी सुशिक्षीत बेरोजगार कामगार सेवा सहकारी संस्था मर्या. कवडगाव बु. | २६/०७/२०२२ | श्री.आर.डी.शिंदे सहकार अधिकारी श्रेणी-२ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| २८ | व्यंकटेश्वरा महीला सुशिक्षीत बे. सहकारी संस्था चिंचाळा | २६/०७/२०२२ | श्री.आर.डी.शिंदे सहकार अधिकारी श्रेणी-२ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| २९ | रेणूका बहूउद्देशिय सर्व सेवा सहकारी संस्था म.वडवणी | १७/०१/२०२३ | श्री.आर.डी.शिंदे सहकार अधिकारी श्रेणी-२ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| ३० | सटवाईदेवी कृषि निविष्टा बहुउद्देशिय सर्व सहकारी संस्था म.वडवणी | १७/०१/२०२३ | श्री.आर.डी.शिंदे सहकार अधिकारी श्रेणी-२ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| ३१ | छत्रपती बहूउद्देशिय सेवा सहकारी संस्था मर्या चिंचोटी. | १७/०१/२०२३ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |
| ३२ | समर्थ कृषी प्रक्रिया सहकारी संस्था मर्या.वडवणी | २६/०७/२०२२ | श्री.एम.के.चव्हाण, सहकार अधिकारी श्रेणी-१ | ३०/३/२०२५ | सकाळी १०.३० ते ६.०० वाजेपर्यंत |

तसेच वरील संस्थांच्या सर्व सभासद धनको ,ऋणको यांना असेही सुचित करण्यात येते की, संस्थेची अवसायन कामकाजाची कार्यवाही पुर्ण करण्याच्या दृष्टीकोनातुन अंतिम सभा वर नमुद केलेल्या रकाणा क्रमांक (5) मधील दिनांकास रकाना क्रमांक (6) मधील वेळेवर सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था ता.वडवणी जि.बीड येथे ठेवण्यात आलेली आहे. सदर सभेस संस्थेच्या सर्व सभासद, धनको ,ऋणको, यांनी त्यांचे आक्षेप व पुराव्यासह हजर रहावे. सदर सभेमध्ये अवसायन कामकाजाचा अहवाल व संस्था नोंदणी रद्द करणे बाबतचा विचारविनिमय केला जाणार आहे याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

**दिनांक - २९ /०१/२०२५**
**ठिकाण - वडवणी**

**( आर.डी.शिंदे )**
**अवसायक**
**सलग्न:-स.नि.सह.सं.वडवणी**

**( एम.के.चव्हाण )**
**अवसायक**
**सलग्न:- स.नि.सह.सं.ता.वडवणी .**

## पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा

**बीड । प्रतिनिधी**

पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. गुरुवार दि. ३० जानेवारी २०२५ रोजी सकाळी ७.२० वाजता चिकलठाणा विमानतळ येथून उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांच्यासमवेत हेलिकॅप्टरने बीडकडे प्रयाण.सकाळी ८.०० वाजता पोलीस परेड ग्राऊंड, बीड येथे आगमन व शासकीय वाहनाने शासकीय विश्रामगृह बीडकडे प्रयाण. सकाळी ८.०५ वाजता शासकीय विश्रामगृह बीड येथे आगमन व राखीव. सकाळी ९.५५ वाजता शासकीय विश्रामगृह येथून शासकीय वाहनाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रयाण. सकाळी १०.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे आगमन व जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस उपस्थिती. दुपारी १२.०० वाजता शासकीय विश्रामगृह बीड येथून परळी वैजनाथकडे प्रयाण. दुपारी १३.वाजता या:श्री निवासस्थान परळी वैजनाथ जि. बीड येथे आगमन व राखीव. शुक्रवार दि.३१ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १७.०० वाजता यश:श्री निवासस्थान, परळी वैजनाथ जि. बीड येथून वाहनाने जालनाकडे प्रयाण.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचा बीड जिल्हा दौरा पुढीलप्रमाणे आहे. गुरुवार दि. ३० जानेवारी २०२५ रोजी सकाळी ७.१० वाजता छत्रपती संभाजीनगर विमानतळ येथे आगमन. सकाळी ७.१५ वाजता हेलिकॉप्टरने बीडकडे प्रयाण. सकाळी ७.५५ वाजता पोलीस परेड ग्राऊंड येथील हेलीपॅड पोलीस मुख्यालय, बीड येथे आगमन सकाळी ८.०० वाजता मोटारीने जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे आगमन. सकाळी ८.०० वाजता बीड जिल्हयातील सर्व शासकीय विभाग प्रमुखांची बैठक (जिल्हाधिकारी,बीड पोलीस अधिक्षक बीड व सर्व संबधित अधिकारी). स्थळ नियोजन सभागृह सकाळी १०.०० वाजता बीड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस उपस्थिती. दुपारी १२.१५ ते १.०० वाजेपर्यंत राखीव. १.१५ वाजता मोटारीने राष्ट्रवादी भवन कार्यालय मित्र नगर येथे आगमन व राष्ट्रवादी भवन जिल्हा कार्यालयास सदिच्छा भेट.दुपारी १.५५ वाजता पोलीस परेड ग्राऊंड येथील हेलीपॅड, पोलीस मुख्यालय बीड येथे आगमन. दुपारी २.०० वाजता हेलिकॉप्टरने छत्रपती संभाजीनगर विमानतळाकडे प्रयाण

## अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा

**बीड । प्रतिनिधी**

अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा पुढीलप्रमाणे आहे. गुरुवार दि. ३० जानेवारी २०२५ रोजी लोहगाव पुणे येथून बीडकडे प्रयाण. सकाळी ६.०० वाजता बीड येथे शासकीय विश्रामगृह बीड येथे आगमन.

## जिप माध्यमिक शाळेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



**चौसाळा । प्रतिनिधी**

चौसाळा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा व केंद्रीय प्राथमिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमानाने प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला यामध्ये सर्वप्रथम महात्मा गांधी व डॉ बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषाच्या प्रतिम चे पूजन शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजा हंपे सरपंच मंगल ताई प्रेमचंद लोढा, जिल्हा परिषद सदस्य अशोक लोढा, शालेय समितीचे अध्यक्ष विनोद शिंदे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली, त्यानंतर राष्ट्रगीत, राज्यगीत गायनाने राष्ट्रध्वजाला सलामी देण्यात आली, शाळेतील क्रीडा शिक्षक श्रीमान आनंद वाघमारे व प्रशांत वायभट सर यांच्या मार्गदर्शनाखाली स्काऊट गाईड पथकाने मंचावरील सर्व प्रमुख पाहुण्यांना मानवंदना देण्यात आली, त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांची प्रभात फेरी श्रीमान सुभाष काकड सर यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आली, प्रभात फेरीनंतर शाळेत आयोजित झांज पथक, कवायत, लेझीम नृत्य विद्यार्थ्यांनीनी सादरीकरण केले क्रीडाशिक्षक श्रीमान वाघमारे सर यांच्या मार्गदर्शनाखाली तलवारबाजी इत्यादीचे प्रात्यक्षिक प्रमुख पाहुण्याच्या समोर करण्यात आले त्यानंतर शाळेत विविध स्पर्धेमध्ये उल्लेखनीय कामगिरी, शालेय क्रीडा स्पर्धा मध्ये विजयी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बक्षीस वितरणाचा कार्यक्रम करण्यात आला प्रमुख पाहुण्याचे हस्ते विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. बक्षीस देणाऱ्या मध्ये प्रमुख शाळेला पंधरा हजार रुपये ची देणगी देणारे माजी प्राचार्य लक्ष्मणराव कवडे, पाच हजार रुपये ची देणगी देणारे माजी शिक्षक श्री पोथरकर सर, शालेय क्रीडा स्पर्धेत विजयी विद्यार्थ्याचे कौतुक करून प्रमाणपत्र देण्यात आले तय तसेच विद्यार्थ्यांसाठी खाऊचे देणगी गावातील व्यापारी वर्ग तसेच प्रतिष्ठित नागरिकांनी व शिक्षण प्रेमी नागरिकांनी दिले, शिशिर गॅस एजन्सी चे संचालक शिंदे सर यांच्यातर्फे विविध स्पर्धेतील स्पर्धकांना बक्षीस वितरण करण्यात आले तसेच राज्य शासनाच्या आदर्श शिक्षक प्राप्त मुख्याध्यापिका पद्मजा हंपे, उत्कृष्ट कार्याबद्दल क्रीडा शिक्षक आनंद वाघमारे, २६ जानेवारी दिवशी जन्म दिवस असल्यामुळे श्रीयुत काकड सर यांचा गावकऱ्यांच्या वतीने सरपंच पती बाबूशेठ लोढा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## गंगाई - बाबाजी महोत्सवाचे आज उद्घाटन

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा आष्टी - पाटोदा - शिरूर चे मा. आ. भीमराव धोंडे यांच्या आई वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ आयोजित केल्या जाणाऱ्या गंगाई - बाबाजी सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन गुरुवार दि ३० जानेवारी रोजी सकाळी १० वा भगवान महाविद्यालय आष्टी येथे उभारण्यात आलेल्या भव्य सभा मंडपात मा. मंत्री प्रा. सुरेश नवले यांच्या शुभहस्ते व मा. आ. भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. उद्घाटनानंतर दुपारी १२ वा. अंतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा होणार आहे. शेतकऱ्यांच्या मुलांचे लांबलेले विवाह एक सामाजिक समस्या, नीती मूल्याचा वाढता ऱ्हास आणि सामाजिक जीवन, ईव्हीएम वरील मतदारांची मनातील वाढती साशंकता हे या वक्तृत्व स्पर्धेचे विषय आहेत. सदर स्पर्धेसाठी ७ मिनिटांचा कालावधी असून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडे आपले ओळखपत्र असणे गरजेचे आहे.

# काम करत आलोय.... काम करत राहू

### दर्जेदार गुणवत्तेचा मोंढा रोड बीडकरांच्या सेवेत अर्पण ; अमर नाईकवाडे, फारुक पटेल यांनी अवघ्या तीन महिन्यात करुन दाखवले काम

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर वासियांसाठी तसेच व्यापारी, विद्यार्थी, तसेच परिसरातील ४० हून अधिक गावांच्या रहदारीचा मार्ग असलेला मोंढा रोड अखेर तीन महिन्यात पूर्ण झाला.



नगरसेवक अमर नाईकवाडे, नगरपालिकेतील गटनेते फारुक पटेल यांनी या रस्त्याचे गुणवत्तापूर्ण काम अवघ्या तीन महिन्यात करुन दाखवले. 'काम करत आलोय, काम करत राहू' हे ब्रीद या निमित्ताने नाईकवाडे-पटेल यांनी पुन्हा एकदा सिध्द करुन दाखवले आहे. यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, मार्गदर्शक तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे व माजी आ.अमरसिंह पंडीत या वरिष्ठ नेत्यांच्या सहकार्यामुळे हे काम पुर्ण होवू शकले अशी विनम्र भावनाही याप्रसंगी नाईकवाडे,पटेल यांनी व्यक्त केली. बीड येथील मोंढा रोडच्या नवीन बांधणी संदर्भात नगरसेवक अमर नाईकवाडे व फारूक पटेल यांनी बीड जिल्हाचे तत्कालीन पालकमंत्री तथा विद्यमान अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे मागणी केली होती. माजी आ. अमरसिंह पंडित यांच्या शिफारशीमुळे या कामाला गती मिळाली अन् मंत्री धनंजय मुंडे यांनी या रस्ता कामासाठी तत्काळ ४ कोटी २० लक्ष रुपयांच्या निधीला जिल्हा नियोजन समिती अंतर्गत मंजुरी दिली होती. त्यानंतर या रस्ता कामाला गत तीन महिन्यांपूर्वी प्रत्यक्षात सुरुवात करण्यात आली होती.

#### बीडकरांच्या वतीने सत्कार

**मोंढा रोड लोकसेवेत अर्पण झाल्यानंतर बीड शहरातील नागरिकांच्या वतीने नगरसेवक अमर नाईकवाडे, गटनेते फारुख पटेल, कंत्राटदार मनोज पाठक यांचा सत्कार करण्यात आला. हा सत्कार म्हणजे आम्ही दिलेल्या वचनाची पूर्ती झाल्याचा आनंद आहे. पुढील कालावधीत काम करण्यासाठी नागरिकांनी आमच्या पाठीवर शाबासकीची थाप दिल्याची भावना पटेल-नाईकवाडेंनी व्यक्त केली.**

## जिल्ह्यातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी मोठ्या संख्येने पुढे या ; फिर्यादीचे धाडस कौतुकास्पद :ॲड. अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचारी निगरगट्ट होत चालले आहेत. अनेकांना लाच घेतल्याशिवाय काम करायची सवय राहिली नाही. त्यामुळे अशा लाचखोरांना अडकवण्याचे अँटी करप्शन मधील फिर्यादिंचे धाडस कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी केले.



दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील अँटी करपशन केसेस करणाऱ्या फिर्यादिंचा सत्कार प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून ड. देशमुख बोलत होते. ते पुढे म्हणाले की, लोकसेवकांनी लाज घेणे टाळले पाहिजे. आता त्यांना मोठ्या प्रमाणात पगार आहे. मात्र लाच घेतल्याशिवाय काम करायची सवय उरलीच नाही. साध्या साध्या कामात देखील लाच मागितली जाते. त्यातून संबंधित व्यक्तीची पिळवणूक होते. आणि शेवटी त्याला नाईलाजाने अँटी करप्शन खात्याकडे धाव घ्यावी लागते. त्यामुळे अशांना जागेवर आणण्याचे काम देखील फिर्यादींनी केलं पाहिजे. भ्रष्टाचार विरोधी जनजागृती अभियान तर्फे या कार्यक्रमाचे आयोजन नवनाथ नाईकवादे यांनी केले होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून हमाल मापाडी संघाचे राजकुमार घायाळ हे होते. तर दुसरे प्रमुख पाहुणे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सांगळे हे होते. देशमुख पुढे म्हणाले की, सन २०२४ मध्ये बीड जिल्ह्यात तिस आरोपी पकडण्यात आले. मराठवाड्यात बीड जिल्हा याबाबतीत अग्रेसर आहे.

## अठरा वर्षे पूर्ण झालेल्या सर्व मतदार बंधू आणि भगिनी यांनी आपली मतदार म्हणून नोंदणी करून घ्यावी : नवनाथ अण्णा शिराळे पाटील

**बीड । प्रतिनिधी**



सध्या बीड जिल्ह्यामध्ये अतिशय उत्कृष्ट आणि अप्रतिम समाजसेवेच्या कार्यामध्ये व देव देश आणि धर्म या ब्रीद वाक्याला अनुसरून सर्व नागरिकांच्या हिताच्या कार्यामध्ये सातत्याने अग्रेसर असलेले तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी गावागावात जाऊन बीड जिल्ह्यातील भारतीय जनता पार्टीचे सदस्य नोंदणी अभियान त्यांच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील सर्वच गावा गावां मध्ये खेड्यापाड्यांमध्ये सुरू आहे याच पार्श्वभूमीवर अठरा वर्ष ज्या मतदार बंधू आणि भगिनींचे पूर्ण झाले असतील अशांनी तात्काळ आपापले मतदान नोंदणी करून आपापले ओळखपत्र निवडणूक आयोगाकडून मिळून घ्यावे या करता त्यांनी आपली नोंदणी करणे अत्यंत आवश्यक आहे. सर्व काळामध्ये सर्वांच्या मदतीला धावणारे असे लोकनेते मा नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे .

## महात्मा फुले स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी प्रशासकीय मान्यता

### माजी उपमुख्यमंत्री आ. छगनराव भुजबळ साहेब यांच्या प्रयत्नांना यश : ॲड. सुभाष राऊत

**माजलगाव । प्रतिनिधी**

पुणे येथील महात्मा जोतिबा फुले वाडा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी भूसंपादन आणि रहिवाशांचे अन्यत्र पुनर्वसन करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी प्रशासकीय मान्यता दिली. या कामांसाठी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून प्रशासकीय



मान्यता मिळाल्याने आता या स्मारकाच्या विस्तारीकरणाला अधिक गती मिळणार आहे. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री आ. छगनराव भुजबळ साहेब यांच्या अनेक वर्षाच्या मागणीला आणि प्रयत्नांना यश मिळाल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, अजित पवार व माजी उपमुख्यमंत्री छगनराव भुजबळ साहेब यांचे अ. भा. म हात्मा फुले समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## बीड - परळी रोडच्या गुत्तेदाराला लोकांचा जीव घ्यायचं लायसन दिलं आहे का ? : धनंजय गुंदेकर

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील महत्वाचा असणाऱ्या बीड - परळी रोडचे काम हे शहरातील बार्शी नाका ते जरूड फाटा दरम्यान सुरू आहे. या कामाला एकतर खूप संथ गती आहे. त्यातही जे काम चालू आहे त्यात लोकांचा जीव घेण्याचे कामच या गुत्तेदार कडून सुरू असून यासंबंधी लक्ष देणारी यंत्रणा झोपा काढतेय की काय अशी परिस्थिती आहे. याबाबत आवाज उठवला जाणार असल्याचे धनंजय गुंदेकर यांनी म्हंटले आहे. बीड - परळी रोडवरील जरूड ते शिवणी फाटा



दरम्यान असलेल्या शिवावरील पुलाचे काम झालेले असताना तेथील मातीचे ढिगारे ऐन मध्येच टाकलेले आहेत, त्या ठिकाणी दोन्ही बाजूने असलेल्या रस्त्याच्या कडेला असलेले खड्डे साक्षात यम देवाचा मुक्काम असल्यागत असून गेल्या २ - ३ दिवसांत तेथे गंभीर अपघात झाले आहेत. या ठिकाणी २ वेगवेगळ्या अपघात हात म ोडण्यापासून ते कायमचे अपंगत्व आलेला अपघात घडला मात्र याकडे ना कुणा अधिकाऱ्याने लक्ष दिले ना कुणी याबाबत कारवाई केली.

## आरटीई प्रवेशासाठी २ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ ; २ हजार २३५ जागांसाठी ४ हजारांवर अर्ज : मनोज जाधव

**बीड । प्रतिनिधी**

आर्थिक दुर्बल व वंचित घटकातील गोरगरीब पाल्यांना श्रीमंताच्या बरोबरीने खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळेत प्रवेश मिळावा यासाठी आरटीई प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या प्रक्रियेला जिल्ह्यात पालकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. जिल्ह्यात २ हजार २३५ जागांकरीता होत असलेल्या प्रवेशासाठी सोमवार २७ जानेवारी शेवटची तारीख होती. त्यामुळे पालकांनी मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. त्यानुसार शिक्षण विभागाकडून याला मुदतवाढ दिली आहे. आता २ फेब्रुवारी पर्यंत पालकांना आपल्या पाल्यांचे प्रवेश - अर्ज करता येणार आहेत त्यामुळे जास्तीत जास्त पालकांनी अर्ज करावेत असे आवाहन शिवसंग्राम युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केले आहे.

**बीड जिल्ह्यातील प्रवेशाची स्थिती अशी**

**सहभागी शाळांची संख्या - २१४**

**प्रवेशासाठी उपलब्ध जागा - २ हजार २३५**

**दाखल ऑनलाइन अर्ज - ४ हजार २८१**

आरटीई प्रवेशासाठी म ुदतवाढ मिळाल्याने पालकांना दिलासा मिळाला आहे. सोमवार सायंकाळ सात वाजेपर्यंत ४ हजार २८१ प्रवेश अर्ज प्राप्त झाले आहेत. जिल्ह्यात आरटीई प्रक्रियेला १६ डिसेंबरपासून सुरुवात करण्यात आली - याम ध्ये ४ जानेवारीपर्यंत पहील्या टप्प्यात शाळा नोंदणीची प्रक्रिया राबविण्यात आली. यादरम्यान जिल्ह्यातील पात्र २१४ शाळांची नोंदणी करण्यात आली आहे. नोंदणी झालेल्या शाळांच्या पटसंख्येच्या २५ टक्केच्या प्रमाणात २ हजार २३५ जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. या जागांवर आता निः शुल्क आरटीई प्रवेश स्वीकारले जाणार आहेत.



*बीड़ जिल्हा वकील संघाचे सदस्य ॲड. असलम आरेफ (शाफे) यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करताना बीड़ जिल्हा वकील संघाचे सदस्य ॲड. शेख शाहजेब, ॲड. सय्यद मीनहाजोद्दीन, ॲड. शेख बिलाल, ॲड. शेख सोहेल, ॲड. शेख वासिम, ॲड. खालेख पठाण, ॲड. समीर शेख, ॲड. शेख आसेफ, ॲड. नदीम पठाण व इत्यादि दिसत आहे.*

## दादा आणि ताईंनी बीड जिल्ह्याला विकासासाठी दत्तक घ्यावं

### बीडचे आर्थिक मागसलेपण दूर करण्यासाठी ना.अजितदादा आणि ना. पंकजाताईंनी पंचतारांकित एमआयडीसी उभी करावी : सलीम जहाँगीर

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात गेल्या काही वर्षांमध्ये मल्टीस्टेट आणि पतसंस्थामुळे प्रचंड प्रमाणात आर्थिक मागासलेपण निर्माण झाले आहे. जवळपास दहा हजार कोटींची फसवणूक मल्टीस्टेट आणि पतसंस्थांनी केलेली आहे. या घोटाळ्यांचा विपरीत परिणाम जिल्ह्याच्या अर्थकारणावर झालेला त्यामुळे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थ व नियोजन मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार, पशुसंवर्धन



मंत्री पंकजाताई मुंडे यांनी एकत्रित रित्या पुढाकार घेऊन बीडमध्ये पंचतारांकित एमआयडीसी उभी करावी आणि जिल्ह्याच्या अर्थकारणाला बळकटी द्यावी अशी मागणी भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यातील ज्ञानराधा, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट, साईराम अर्बन यासह अनेक म ल्टीस्टेट आणि पतसंस्थांनी लाखो ठेवीदारांची फसवणूक केली आहे. दहा हजार कोटींच्या घोटाळ्यामुळे बीडचे अर्थकारण पूर्णपणे कोलम डले आहे. जिल्ह्यात मोठे उद्योगधंदे नाहीत, व्यवसाय वाढीसाठी दळणवळण नव्हते मात्र देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांनी दिलेला भरघोस निधी आणि ना. पंकजाताई, प्रितम ताई मुंडे यांचा पाठपुरावा यामुळे बीडच्या रेल्वेचा प्रश्न जवळपास मार्गी लागला असून रेल्वे बीड पर्यंत धावण्यास सज्ज झाली आहे. सद्या जिल्ह्यात औद्योगिक वसाहती नाहीत यामुळे विकासाला खिळ बसलेली आहे. मात्र आता बीड जिल्ह्यासाठी मोठी संधी निर्माण झालेली आहे. राज्यात महायुतीचे सरकार आहे. बीडचे पालकमंत्री पद अजितदादांकडे आलेले आहे तर पंकजाताई मुंडे या देखील मंत्री आहेत. दोन्हीही विकासाभिमुख नेत्यांनी आता एकत्रितपणे बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी पुढाकार घ्यावा. दादा आणि ताई यांनी ठरवले तर बीड जिल्ह्याचे मागासलेपण दूर होईल आणि विकासात्मक राजकारणाची मुहूर्तमेढ या माध्यम ातून रोवली जाईल. अजितदादा आणि ताईंनी बीड जिल्ह्याच्या विकासाची सुरुवात बीडमध्ये पंचतारांकित एमआयडीसी उभारण्याचा निर्णय घेऊन करावी. बीडमध्ये अत्याधुनिक औद्योगिक वसाहत उभारली गेल्यास जिल्ह्याच्या विकासाला नक्कीच चालना मिळेल.

